Vol 6 Issue 3 September 2016

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

Regional Editor

Dr. T. Manichander

International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 3 | September - 2016

GRT Golden Research Thoughts

अण्णाभाऊंच्या शाहिरीतील समाजवास्तव

विश्वजीत कांबळे
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, शिवरामजी मोघे महाविद्यालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ.

सारांश

शाहिरी काव्याचा सापेक्षी विचार करता अण्णाभाऊंची शाहिरी कामगार, कष्टकरी, शेतकरी यांच्या जीवनातील वास्तव साकारणारी आहे. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारापासून मुक्ती मिळण्यासाठी अण्णाभाऊंची शाहिरी प्रबोधन करणारी आहे. जातीव्यवस्था नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी ही शाहिरी समाजमनाला जागवित आहे. वर्गसंघर्षाचा उद्रेकी आविष्कार म्हणून अण्णाभाऊंच्या शाहिरीचे विशेष महत्त्व आहे. अण्णाभाऊंची शाहिरी स्त्रियांचा सन्मान करणारी आहे. विषमतेला जाळणारी आहे. आणि मानवतेच्या वाटेवरून समतेच्या गावी घेऊन जाणारी आहे. अन्यायकारक विषमतावादी व्यवस्था उलथून पाडण्यासाठी अण्णाभाऊंची शाहिरी कामगारांना, शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना आणि एकूणच समाजजीवनाला संघटित करीत आहे. अण्णाभाऊंची शाहिरी डॉ. बाबासाहेब आंबेडेरांच्या समतावादी विचाराने जग बदलण्यासाठी क्रांतिक संघर्ष करणारी आहे.

अण्णाभाऊंची शाहिरी केवळ कामगारांच्या व्यथा-वेदनेभोवतीच गुरफटत नाही तर समाजातील तळागळातल्या माणसांच्या गरजेपर्यंत जावून पोहचते. अण्णाभाऊंची शाहिरी शृंगार रसाने भरलेली नाही तर कामगारांच्या घामाने तिला नवा सुवास प्राप्त झाला आहे. आणि म्हणून अण्णाभाऊ म्हणतात की, ''पृथ्वी नागाच्या फण्यावर नसून ती कामगारांच्या तळहातावर तरली आहे.'' अण्णाभाऊंची विचारसरणी अंधश्रद्धेवर आसूड ओढणारी आहे हे वेगळे सांगायची गरज नाही.

थोडक्यात सांगायचे म्हणजे अण्णाभाऊंची शाहिरी समाजातल्या घडामोडींचे सुक्षपणे निरीक्षण करणारी आहे. कामगारांचं जीवन गिरणीतल्या मशिनसारखं सतत गरगरत असते, ही गरगर थांबविण्यासाठी अण्णाभाऊंच्या शाहिरीने प्रबोधनात्मक संघर्ष उभा केला आहे. अण्णाभाऊंची शाहिरी समाजजीवनाचे वास्तव दर्शन घडविणारी आहे. बदलत्या सामाजिक संदर्भांचा, समाजवास्तवाचा आणि जीवनानुभवातून उद्भवणाऱ्या नव्या जाणिवांचा व संवेदनांचा आविष्कार अण्णाभाऊंच्या शाहिरीत आहे.

बीजशब्द : समाजवास्तव, वर्गसंघर्ष, जीवनानुभव, कामगार, व्यवस्था परिवर्तन, कृषी संस्कृती, लोकशिक्षण, समाजजीवन.

प्रस्तावना

परिवर्तनाच्या चळवळीत प्रबोधन करण्यासाठी, माणसात नवी ऊर्जा निर्माण करण्यासाठी तंतांनी म्हणजेच शाहीरांनी साहित्य निर्माण केले ते तंत साहित्य म्हणजे शाहिरी काव्य होय. शाहिरी काव्यात मुख्यत्वे 'पोवाडा' व 'लावणी' हे दोन प्रकार महत्त्वाचे आहेत. पोवाडा हा वीररस प्रधान असून त्यात वीरांच्या शौर्यगाथा वर्णन केलेल्या असतात. लावणी शृंगाररस प्रधान असते. पोवाड्याात जी वीरकथा वर्णन केलेली असते तिच्यात रंग भरण्यासाठी अभिनय, काल्पनिक कथा, विनोद, उपरोध इत्यादींचा वापर करण्यात येतो म्हणून हा काव्यप्रकार मोठा नाट्यापूर्ण असून त्याची रचना धावती असते. पोवाड्याात वीररस मुख्य असला तरी त्यात शृंगार, करूण, हास्य इत्यादी रसांचे मिश्रण असते. लावणीचा मुख्य विषय 'शृंगार' पण या शृंगाराला वीररसाचे अधिष्ठान असतेच. कदाचित वीररसाच्या पार्श्वभूमीमुळेच लावणीची लज्जत वाढत जाते. गेयता, तालबद्धता, खटकेबाजपणा, वेगवेगळ्याा रसांची जोड अशी लावणीची वैशिष्ट्ये सांगता येतील. राम जोशी, अनंत फंदी, होनाजी बाळ इत्यादी प्रसिद्ध शाहीरांनी लावणीला मोठे केले आहे. अण्णाभाऊंची शाहिरी अशीच आपल्या काळजात घर करून राहणारी आहे.

जेव्हा वेदना आणि दुःख हे हसण्याचा विषय होतो तेव्हा विद्रोहाचा आणि उद्रेकाचा जन्म होतो. या जाणिवेतून महात्मा जोतीबा फुलेंच्या काळात सत्यशोधक तमाशे आलेत. सत्यशोधक जलसे आलेत आणि सत्यशोधक शाहिरी सुद्धा आली. महात्मा जोतीबा फुले यांच्या शिवाजी महाराजांच्या पोवाड्याने शाहिरी काव्याला नवी दृष्टी मिळाली. याच ऊर्जेतून पुढे शाहिरी काव्य बहरत गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिक प्रेरणेतून

आंबेडकरी जलसे आणि आंबेडकरी शाहिरी उदयास आली. आंबेडकरी शाहिरीने शाहिरी काव्यातून परिवर्तनाची चळवळ उभी केली. अशा विद्रोहाच्या ठिणगीतूनच अण्णाभाऊंची शाहिरी समाज परिवर्तनासाठी निर्माण झाली.

अण्णाभाऊंचा जीवनप्रवास

सध्याच्या सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी १ ऑगस्ट १९२० रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्म झाला. आई वालुबाई आणि वडिल भाऊराव या दापंत्यांनी त्यांचे नाव तुकाराम ठेवले होते परंतु सर्वजन त्यांना प्रेमाणे अण्णा म्हणत असत. अण्णाभाऊ मातंग जातीचे म्हणजेच मागासवर्गीय होते. जातीच्या उतरंडीमुळे त्यांना शाळेचा उंबरठा ओलांडता आला नाही. वाटेगावच्या शाळेत त्यांचे नाव घातले होते. परंतु त्यांना त्या शाळेत मिळालेल्या गुरूजींच्या वागणुकीमुळे त्यांनी पुन्हा शाळेचे तोंड कधी बघितले नाही.

वाटेगावमधून अण्णाभाऊंची शाळा सुटली होती. पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या वडिलांनी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला. आई वडिलांसोबत ते मुंबईला आले. मुंबईत त्यांनी अनेकप्रकारची कामे केली. गिरणी कामगार म्हणूनही काम केले. दरम्यान त्यांचा अनेक संघटनांशी संपर्क आला. यातून त्यांना बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. विविध संघटना, मोर्चे, सभा, सत्याग्रह, आंदोलने या सर्व गोष्टी अण्णाभाऊंनी जवळून बघितल्या होत्या. याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्वावर झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी ते प्रभावित झाले. या प्रभावातून अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्वाला आकार आला. अण्णाभाऊ लिहू लागले आणि अण्णाभाऊ आपल्या बुलंद अशा पहाडी आवाजातून गाऊ लागले.

अण्णाभाऊंचा जीवनप्रवास अत्यंत खडतर असा आहे. अण्णाभाऊंच्या लेखणीतील प्रभाविपणा आणि आवाजातील दमदारपणामुळे ते प्रसिद्ध लोकशाहीर झालेत. विषम वर्गव्यवस्थेचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविणारा, महाराष्ट्राच्या ग्रामीण मातीतील बोली आणि कलांचा संस्कार घेऊन आलेला लोकशाहीर म्हणून अण्णाभाऊंची प्रतिमा आहे.

अण्णाभाऊंची साहित्य संपदा

महाकवी वामनदादा कर्डक, भिकू डंभारे, गोविंद म्हशीलकर, प्रल्हाद दादा शिंदे, विठ्ठल शिंदे अशा नामांकित शाहीरांप्रमाणे अण्णाभाऊ देखील प्रसिद्ध शाहीर होते. अण्णाभाऊंनी प्रचंड साहित्य संपदा निर्माण केली. अग्निदिव्य, अलगूज, अहंकार, आग, आघात, आवडी, केवड्याचे कणीस, कुरूप, गुलाम, चंदन, चिखलातील कमळ, चित्रा, जिवंत काडतूस, ठासलेल्या बंदुका, डोळे मोडीत राधा चाले, तास, धुंद रानफुलाचा, पाझर, फकिरा, फुलपाखरू, मंगला, मथुरा, माकडीचा माळ, मास्तर, मूर्ती, रत्ना, रानगंगा, रानबोका, रूपा, वारणेचा वाघ, वारणेच्या खोऱ्यात, वैजयंता, वैर, संघर्ष, सैरसोबत अशा पस्तीस कादंबऱ्या अण्णाभाऊंनी लिहिल्या आहेत.

आबी, कृष्णाकाठच्या कथा, खुळंवाडी, गजाआड, गुऱ्हाळ, चिरानगरची भुतं, नवती, निखारा, पिसाळलेला माणूस, फरारी, बरबादच्या कंजारी, भानामती, लाडी असे बारा कथासंग्रह अण्णाभाऊंच्या नावावर आहेत. जवळपास ३०० च्या वर कथा अण्णाभाऊंनी लिहिल्या आहेत. इनामदार, पेंग्याचं लगीन, सुलतान ही तीन नाटके, सुमारे पंधरा वगनाट्योही लिहिली आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी अकलेची गोष्ट, कलंत्री, खापऱ्याचोर, दुष्काळात तेरावा, देशभक्त घोटाळे, निवडणुकीतील घोटाळे, पुढारी मिळाला, बिलंदर बुडवे, बेकायदेशीर, माझी मुंबई, मूक मिरवणूक, लोकमंत्र्यांचा दौरा, शेटजीचं इलेक्शन इत्यादी गाजलेले तमाशे वजा लोकनाट्यो लिहिली.

अमळनेरचे अमर हुतात्मे, काळ्याा बाजाराचा पोवाडा, तेलंगणाचा संग्राम, नामकीन नगरापुढे, पंजाब-दिल्लीचा दंगा, बंगालची हाक, बर्लिनचा पोवाडा, महाराष्ट्राची परंपरा, मुंबईचा कामगार, स्टलिनग्राडचा पोवाडा असे प्रसिद्ध पोवाडे आणि अनेक लावण्या त्यांनी लिहिल्या. 'माझा रशियाचा प्रवास' हे त्यांचे एक प्रसिद्ध प्रवास वर्णन आहे. अण्णाभाऊंच्या जवळपास बारा कथांवर चित्रपट निघाले आहेत.

अण्णाभाऊंच्या साहित्याचे हिंदी गुजराती, उडीया, बंगाली, तमीळ, मल्याळी इत्यादी भारतीय भाषांबरोबरच रशियन, इंग्रजी, फ्रेंच अशा जगातील २७ भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. अण्णाभाऊंची साहित्य संपदा त्यांच्यातील साहित्य सम्राटाची ओळख करून देते. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून नेहमीच सामान्य माणसांची व्यथा मांडलेली आहे. सामान्य वाचकाला प्रमाण मानल्यामुळे वस्तुनिष्ठ आणि वास्तवस्पर्शी असलेले त्यांचे साहित्य वाचकांना आपले वाटू लागले. त्यांची गाणी आणि लावण्या आजही लोकप्रिय आहेत. विशेषतः कामगार वर्गात अधिक लोकप्रिय आहेत.

अण्णाभाऊ प्रतिभासंपन्न लोककलावंत असल्यामुळे त्यांच्या साहित्यात अनेक प्रतिमा येतात. अण्णाभाऊंच्या साहित्यातील प्रतिमा परिवर्तनाचे नवे संदर्भ घेऊन येणाऱ्या आहेत. त्यामुळे त्या प्रतिमांचे अर्थ समजून घेताना बऱ्याचदा गफलत होते. हे आपण पहिल्यांदा समजून घेतले पाहिजे. कारण अण्णाभाऊंच्या साहित्यातील प्रतिमा परंपरेचे गुणगाण गाणाऱ्या नाहीत, तर विषमतावादी व्यवस्थेवर प्रहार करून मानवी कल्याण साधणाऱ्या आहेत. समाजव्यवस्थेचे वास्तव दर्शन घडविणाऱ्या आहेत.

अण्णाभाऊंच्या शाहिरीतील समाजवास्तव

अण्णाभाऊंची शाहिरी ही लोकशिक्षणाचा वसा घेऊन अवतीर्ण झाली आहे. ही शाहिरी परिवर्तनासाठी क्रांतीचा हात धरून चालणारी आहे, माणसात नवी ऊर्जा निर्माण करणारी आहे. रंजनातून लोकजागृती करणे हा शाहिरीचा उद्देश असला तरी अण्णाभाऊंची शाहिरी रंजनवादाला बगल देत सामाजिक आणि राजकीय जीवनातील परिवर्तनाचा नवा विचार मांडते. शेतकरी, कामगार, कष्टकरी, शोषित यांच्या दैनंदिन जीवनातील प्रश्न घेऊन त्यांची शाहिरी बहरत गेली आहे. समाजाला जागृत करण्यासाठी ही शाहिरी आक्रोशली आहे. विषमतेवर आघात करीत समतेसाठी ती आसूसली आहे. राष्ट्रप्रेमाणे ती ओतप्रोत भरली आहे.

वैयक्तिक दुःखाचा विचार न करता अण्णाभाऊंच्या शाहिरीने उपेक्षितांच्या व्यथा-वेदना प्रभाविपणे मांडल्या आहेत.

कामगारांचे प्रश्न आणि ते समजावून घेण्यासाठी नियुक्त केले जाणारे 'लवाद' यावर अण्णाभाऊंनी कटाक्ष टाकला आहे. कामगारांचे जीवन, त्यांना करावे लागणारे कष्ट, मिळणारा मोबदला याचा विचार न करता हे लवाद सरकार आणि मालकाची बाजू घेऊन कामगारांचे शोषण करणाऱ्यांना कशी मदत करतात याचे प्रत्ययकारी चित्रण अण्णाभाऊंनी केले आहे.

उदार होऊनी नेमी सरकार
लवादाचा ऐका परकार।।
मालकाच्या मतानं आणि सरकारच्या सुतानं
निवड होते लवादाची
लवाद म्हणजे माणूस
पण जात निराळी असे त्याची
मोठा पगार, मोठा दर्जा, मोठ्या इभ्रतीची।।
सात पिढीला त्याच्या
ओळख नसते गिरणी कामाची।।
(लवादाचा ऐका परकार)

लवादाची निवड कशाप्रकारे केली जात होती हे सांगून त्यांनी भांडवलदार आणि शासन यांच्यातील आंतरिक संबंधावर प्रकाश टाकला आहे. भांडवलदार आणि सरकार हे कसे हातात हात घालून चालतात यासाठी अण्णाभाऊंनी योजिलेले 'छकडा' हे रूपक मार्मिक आहे.

अण्णाभाऊंनी 'मुंबईचा गिरणी कामगार' या पोवाड्यातून कामगार चळवळीचे धगधगते वास्तव रूप साकारले आहे. कामगार चळवळीला दडपून टाकण्यासाठी सरकार आणि मालकवर्ग यांनी चालविलेल्या प्रयत्नांचे निदर्शन त्यांनी केले आहे. या पोवाड्यातून अण्णाभाऊंनी १९०८ सालापासूनच्या कामगार चळवळीचा सापेक्षी इतिहासच मांडला आहे.

मुंबईत संप जाहला, आणि वणव्यासम पसरला
तो चौऱ्यांशी गिरणीला, ग्रासून मोकळा झाला।।
कामगार एक जाहला, सहा महिने संप लढविला
चेव आला सरकारला, दडपण्या कामगाराला
शस्त्रांचा खच लागला, ठायी ठायी राजरस्त्याला।।
(मुंबईचा गिरणी कामगार)

मुबईतील कामगार जीवनाची व्यथा अण्णाभाऊंनी अतिशय भाऊकपणे मांडली आहे. अशाचप्रकारे कामगारांची व्यथा वेदना सांगणारा 'अमळनेरचे हुतात्मे' हा पोवाडा प्रसिद्ध आहे. कायद्याच्या राज्यात कामगार आणि गोरगरिबांची कशाप्रकारे पिळवणूक केली जाते, भांडवलदारांकडून कामगारांच्या हक्क अधिकारांना कशाप्रकारे पायमल्ली तुडविल्या जाते यावर प्रकाश टाकणारी अण्णाभाऊंची एक क्रांतिकारी रचना म्हणजे 'काळा बाजार' ही होय. अशाचप्रकारची त्यांची एक रचना 'बंगालची हाक' ही आहे. माणसाच्या जीवापेक्षा त्यांचे नफ्यावरच कसे अधिक लक्ष असते याविषयी या पोवाड्यात वर्णन केले आहे.

अनेक शाहीरांनी मुंबईच्या बाह्य लावण्याचे आणि मुंबईच्या झगमगाटाचे वर्णन केले आहे. परंतु अण्णाभाऊंनी 'मुबईची लावणी' लिहून विषमतावादी व्यवस्थेवर आसूड ओढले आहे. साम्यवादी विचारांचा पुरस्कार करणाऱ्या अण्णाभाऊंना मुंबई ही विषम व्यवस्थेचे माहेरघर वाटते. एकीकडे भांडवलदार वार्गाची आकाशाला गवसनी घालणारी भरारी तर दुसरीकडे बेकारी, लाचारी, आणि पोट भरण्याची मारामार असणारा गरीब कष्टकरी कामगारांचा वर्ग. मुंबईतील मलबार हिलवरील वस्तीला अण्णाभाऊ इंद्रपुरी म्हणतात. तेथे सर्व कुबेर श्रीमंत ऐश आरामात राहतात, तर परळात राहणारे लोक रात्रंदिवस कष्ट करून घाम गाळतात आणि मिळेल ते खऊन कसंतरी जीवन जगतात.

मुबईत उंचावरी, मलबार हिल इंद्रपुरी
कुबेराची वस्ती तिथं सुख भोगती।।
परळात राहणारे, रात दिवस राबणारे
मिळेल ते खाऊनी घाम गाळती।।
(मुंबईची लावणी)

मुंबईच्या नायगाव, धारावीतले, माटुंग्याच्या परिसरात राहणारे कामगार, कष्टकरी घाणीत उघडी नागडी लोळतात. दुसरीकडे मोतीबाजार, शेअरबाजार येथे व्यापाराची उलाढाल होते. तेथे सारे सट्टेवाले सट्टा खेळतात आणि मोठ्या दिमाखात जीवन जगतात. तर मुंबईच्या फोरस रोड, तीन बत्ती, गोलपिठा नाक्यावर मजबूर होऊन कित्येक स्त्रियां शरीर विक्रय करून पोट भरतात. वैभवशाली मुंबईच्या कुशीत वाढणारे हे गलिच्छ जीवन अण्णाभाऊंना अंतर्मुख करते.

मोतीबाजार, शेअरबाजार, तिथे चाले मोठा व्यापार
सारे सट्टेवाले तिथं सट्टा खेळती।।
फोरास रोड, तीन बत्ती, गोलपिठा नाक्यावरती
शरीर विकून कितीक पोट भरती।।
(मुंबईची लावणी)

अण्णाभाऊ आपल्या शाहिरीच्या माध्यमातून समाजाच्या मानसिक दुर्बलतेचं, मानसिक गुलामगिरीचं दर्शन घडवून थांबत नाहीत तर समाजाला यातून मुक्त करण्यासाठी आणि आपला स्वाभिमान जागविण्यासाठी प्रवृत्त करतात. हातात क्रांतीची मशाल घेऊन ही शाहिरी अपलं जीवन बदलण्यासाठी प्रबोधन करीत आहे. या रचनेतील 'लाल झेंडा' हे क्रांतीचं प्रतीक आहे. मजूर वर्गाचं दुबळं जिणं बदलण्यासाठी क्रांतीचा लाल झेंडा हाती घेताना अण्णाभाऊ म्हणतात,

लाल झेंडा घेऊन हाती, करायाला इथे कांती
मजुरांची पिढी नवी पाऊल टाकती।।
अण्णाभाऊ साठे म्हणे, बदलुनी हे दुबळे जिणे
होणार जे विजयी ते रण करती।।
(मुंबईची लावणी)

अण्णाभाऊंची मुंबईची लावणी अशाप्रकारे विषमतेवर प्रहार करून आपल्या पुढच्या पिढ्यांच्या आणि स्त्रियांच्या सन्मानासाठी त्यांना क्रांती करण्यासाठी ललकारत आहे.

'कथा मुंबईची' या शाहिरीतून अण्णाभाऊंनी मुंबईची कथाच व्यक्त केली आहे. मुंबईची ही कथा मुबईचे वास्तव जीवन साकारणारी आहे.

कथा मुंबईची सुरू आता करतो
इथं माणूस भवऱ्यावाणी फिरतो।।
इथं दिसती उंच माड्या, लांब झिपऱ्या शेंड्या दाढ्या
इथं मोकळ्या जागेत गाढवावाणी
खुशाल लोळती कैक झोपड्या।।
(कथा मुंबईची)

कम्युनिस्ट विचारांचा पगडा जरी अण्णाभाऊंवर असला तरी त्यांची शाहिरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना उरात घेऊन परिवर्तनाची पहाट उगवू पाहात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी संपूर्ण जगालाच प्रभावित केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्यापुढे एक प्रकाशवाट अंथरून ठेवली आहे. समाजवादी जीवनध्येयाची मांडणी करून ठेवली आहे. विषमतावादी व्यवस्था नष्ट करून जग बदलण्याची ताकद बाबासाहेबांच्या विचारात आहे हे अण्णाभाऊंनी जाणले होते. या जाणिवेतून अण्णाभाऊंनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून व्यवस्था परिवर्तनाचा क्रांतिक उद्‌घोष केला. 'जग बदल घालुनी घाव' अण्णाभाऊंची ही रचना बाबासाहेबांच्या वैचारिक क्रांतीचे प्रतीक आहे, परिवर्तनासाठीची ऊर्जा आहे, प्रबोधनाचे नवे पर्व आहे. गुलामगिरीच्या चिखलात अडकलेल्या समाजाला बाहेर काढून त्याला मुक्त करण्यासाठी अण्णाभाऊ बाबासाहेबांच्या विचारांनी जग बदलण्याची भूमिका मांडताना म्हणतात,

जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव
गुलामगिरीच्या या चिखलात, रूतून बसला का ऐरावत
अंग झाडूनी निघ बाहेरी, घे बिनीवरती धाव।।
धनिकशहांनी अखंड पिळले, धर्मांधांनी तसेच छळिले
मगरांनी जणू माणिक गिळिले, चोर जाहले साव।।
ठरवुनी आम्हा हीन कलंकित, जन्मोजन्मी करूनी अंकित
जिणे लादुनी वर अपमानित, निर्मून हा भेदभाव।।
एकजुटीच्या या रथावरती, आरूढ होऊनी चला पुढती
मिळूनी स्वातंत्र्य घ्या जगती, करी प्रकट निज नाव।।
सांगून गेले मला भीमराव...
(जग बदल घालुनी घाव)

अण्णाभाऊंच्या या आविष्कारात जग बदलण्याचा एक निर्धार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित सामाजिक समता निर्माण करण्यासाठी बाबासाहेबांचा संदेश अण्णाभाऊ या शाहिरीतून देत आहे. समतेचे नवे जग निर्माण करण्यासाठी अर्थात

जगाला धम्मराज्य बनविण्यासाठी ही शाहिरी आक्रंदली आहे.

अण्णाभाऊंची शाहिरी देशभर दुमदुमली ती मनोरंजनासाठी नाही तर व्यवस्था परिवर्तनासाठी निनादली आहे. भांडवलदारांच्या अन्यायकारक प्रवृत्तींचा उच्छेद करण्यासाठी ती शेतकरी, कामगार, कष्टकरी यांना प्रोत्साहित ऊर्जा देण्यासाठी झटली आहे. आपल्या हक्क अधिकारासाठी, स्वाभिमानासाठी, आपल्या अस्मितेसाठी व्यवस्था परिवर्तनाच्या लढ्यात सामील होण्यासाठी अण्णाभाऊ शेतकऱ्याची प्रतिमा समोर ठेवून तमाम शोषितांना आवाहन करीत आहेत. अण्णाभाऊंनी याही शाहिरीतून जग बदलण्याचाच संदेश दिला आहे.

तू मराठमोळा शेतकरी घोंगडी शिरी
जुनी ती काठी, जुनी लंगोटी बदल ही दुनिया सारी
रे चल बदल ही दुनिया सारी।।
राबुनी थंडीवाऱ्यात, गाळुनी घामाच्या धारा
लाविशी रास मोत्यांची परी नाही तुला रे थारा
तू खाशी कांदा भाकरी बसून अंधारी
भुकेला कोंडा, निजेला धोंडा, बदल ही दुनिया सारी।।
(तू मराठमोळा)

शेतामध्ये राबून अन्न धान्य पिकविणारा शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे पोटभर खाऊ शकत नाही. स्वतःची इज्जत झाकण्यासाठी पुरते वस्त्र मिळण्याची त्याला मारामार. रोगराई आणि दुष्काळाचा तोच बळी ठरतो. अशा विविध समस्यांनी ग्रस्त झालेल्या शेतकऱ्याची व्यथा अण्णाभाऊंनी चित्रित केली आहे. अशा लाचार जीवनातून मुक्त होण्यासाठी शेतकऱ्यांनी संघर्ष करणे आवश्यक असल्याचे निर्णायक मत अण्णाभाऊंनी मांडले आहे.

नवजीवनाचा उन्मेष म्हणून अण्णाभाऊंनी कम्युनिस्ट विचारसरणी अनुसरली होती. या विचारातून अण्णाभाऊ परिवर्तनाची नवी वाट निर्माण करण्यासाठी झटत होते. आपल्या जीवनातील अंधार दूर करून आपले जीवन प्रकाशमान करणारा क्रांतीचा नवा सूर्य परिवर्तनाच्या क्षितिजावर उगविणार असा आशावाद व्यक्त करताना अण्णाभाऊ म्हणतात,

रवि आला लावुनी तुरा, निघाली जिंदगी भरभरा।।
दीप गगनाच्या डोईवर लागला, ढग तिमिराचा त्याने निवारिला
झाले आकाश लाल, बघ उधळी गुलाल
रानारानात हर्ष पसरला, आला बहर गुलमोहरा
निघाली जिंदगी भरभरा।।
(रवि आला लावुनी तुरा)

सूर्योदयाच्यावेळी आकाशाला आलेली लाली आणि रखरखत्या उन्हात बहरास आलेली गुलमोहराची फुले अण्णाभाऊंना क्रांतिच्या लाल निशानाचे प्रतिकात्मक रूप वाटते. अण्णाभाऊंची शाहिरी अशाप्रकारे जगण्याची नवी दिशा देणारी आहे.

अण्णाभाऊंच्या शाहिरीने कृषी संस्कृतीसह शेतात राब-राब राबणाऱ्या शेतकऱ्याचा आणि या सभोवतालच्या स्त्रीजीवनाचा गौरव केला आहे. अण्णाभाऊंची ही शाहिरी शेतात राबणाऱ्या कष्टकरी स्त्रीजीवनाचं गौरव गीत आहे. माझ्या शिवारात अर्थात माझ्या शेतात निघालेलं पीक ही साऱ्या दुनियेची दैलत असल्याचा अभिमान अण्णाभाऊंनी व्यक्त केला आहे.

दुनियेची दौलत सारी, गड्या दुनियेची दौलत सारी
बघ पिकलीया माझ्या शिवारी।।
(दुनियेची दौलत सारी)

याच शाहिरीत पुढे अण्णाभाऊ शेतातील पिकांचं वर्णन करतात आणि पीक निर्माण करणाऱ्या कष्टाचं मूल्यमापन करतात. रात्रंदिवस शेतात कष्ट करणाऱ्या स्त्रियांचा सन्मान अण्णाभाऊंनी केला आहे. हा सगळ्या शेतकरी वर्गाचा सन्मान आहे.

रातदिवस राबून कसली
आली भरात अन मुसमुसली
आज आनंदान बघ हसली
वर आकाश उधळीत लाली
खाली सोनेरी ही शेतसरी।।
कणसं मक्याची हुरड्याला आली
बसली हळद लाजून खाली
तूर शेंगानं आपुल्या न्हाली

गहू खपलीचा लहरा मारी
भुईमूग रोवून बसला आरी।।
(दुनियेची दौलत सारी)

शेतकऱ्यांनी रात्रंदिवस राबून पिकाचं उत्पादन करावं आणि पीक निघाल्यावर भांडवलदार तथा सावकारांनी ते लुटून न्यावं आणि दौलतीचा राजा असलेल्या शेतकऱ्यांनी पुन्हा हवालदिल व्हावं. असं एकंदरित शेतकरी जीवनाचं विदारक चित्र अण्णाभाऊ आपल्या शाहिरीतून उभं करतात.

आपल्या उभ्या पिकाच्या रक्षणासाठी आपण सर्व शेतकऱ्यांनी एक होण्याचा संदेश अण्णाभाऊ देतात. आपल्यावर अन्याय करणाऱ्या भांडवलशाहीला आणि सावकारशाहीला हाकलून देण्यासाठी अण्णाभाऊ ही एकी घडवून आणत असल्याचे आपण लक्षात घ्यायला हवे.

यारे हातात गोफण घेऊ
रान राखाया एकीनं जाऊ
ऐतखाऊंना हाकलून देऊ
जिवापरीस आमुची प्यारी
धरणी कसेल त्याची सारी।।
(दुनियेची दौलत सारी)

अण्णाभाऊ सगळ्याा शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना आपल्या शाहिरीच्या माध्यमातून अस्तित्वाची जाणीव करून देतात. भांडवलशाहीचा आणि सावकारशाहीचा विकारी कुंदा उपटून फेकण्यासाठी ते संघटित होऊन शिवारी निघाले आहेत. अण्णाभाऊंची ही शाहिरी शेतकऱ्यांना एकीने राहण्याचा संदेश देत इथल्या साम्राज्यशाहीचा बिमोड करण्यासाठी आसूसली आहे.

दौलतीच्या राजा उठून सर्जा
हाक दे शेजाऱ्याला रे शिवारी चला।।
संदी लई नामी आलीया अवंदा
सावकारशाहीचा विखारी कुंदा
आरपार खुरपून पाडाया रेंदा
दाखवाया बळा उचल घे इळा
पोलादी पाजळून आपला रे शिवारी चला।।
(शिवारी चला)

अण्णाभाऊंच्या या शाहिरीने व्यवस्था बदलण्यासाठीचा गर्भित इशारा दिला असल्याचे लक्षात येते. यासाठी ही शाहिरी 'एकिचा बांधुनी किल्ल रे शिवारी चला' अशी जागरूक हाक देत आहे.

अण्णाभाऊंनी लिहीलेला 'बर्लिनचा पोवाडा' हा जागतिक इतिहासातील एका घटनेवर आधारित आहे. १९२९ साली मे महिन्याच्या एक तारखेला कामगारदिन साजरा करण्यासाठी बर्लिन शहरात कामगार जमले असताना भांडवलदारांचे पित्त खवळले आणि हजारो कामगारांच्या रक्ताने बर्लिन शहर न्हाऊन निघाले होते. या चित्तथरारक घटनेची नोंद अण्णाभाऊंच्या शाहिरीने घेतली आहे.

1929 साला, मे महिना पहिल्या तारखेला
बर्लिनच्या नगर चौकाला
कामगार एक जाहला
मे दिन ऐक्यानं साजरा करण्याला
हे खपले नाही भांडवलदाराला
त्यांनी हुकूम सैनिकांना दिला
जोराचा गोळीबार केला
हजारो कामगार पडले तेव्हा भूमीला
रक्ताने रस्ता बर्लिनचा लाल झाला।।
(बर्लिनचा पोवाडा)

भांडवलदारांनी स्वार्थासाठी हिटलरी मार्गाने केलेले हे कृत्य अमानवीय असेच होते. कामगार चळवळीच्या इतिहासातील ही अपूर्व घटना होती. बर्लिन मधिल या घटनेप्रमाणे चिनमध्ये कामगार चळवळीवर झालेल्या अन्याय-अत्याचाराची नोंद अण्णाभाऊंनी 'चिनीजनांची मुक्तीसेना' या पोवाड्याात घेतली आहे.

अण्णाभाऊंची 'माझी मैना गावावर राहिली' ही लावणी मराठी साहित्यातील एक उत्कृष्ट कलाकृती म्हणून प्रसिद्ध आहे. शाहीर गव्हाणकर, शाहीर अमरशेख यांनी या शाहिरीला महाराष्ट्रात लोकप्रिय केले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची रूपकात्मक लावणी म्हणून ती प्रसिद्ध आहे. तर या लावणीची दुसरी बाजू म्हणजे विषमतावादी व्यवस्थेत कामगाराला आपलं घरदार सोडून पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईला जावे लागते. त्या कामगाराच्या मनाची होणारी तगमग या लावणीचा विषय आहे.

या लावणीत अण्णाभाऊंनी पत्नीपासून विलग होताना आणि विलग झाल्यानंतरच्या होणारी मनाची अवस्था विशद केली आहे. या लावणीतील नायक कामगार आपल्या पत्नीच्या सौंदर्याचा, कौशल्याचा आणि सामर्थ्याचा गुणगौरव करातो. स्त्रियांचे सामाजिक स्थान उंचावण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ या लावणीच्या माध्यमातून करतात.

माझी मैना गावावर राहिली
माझ्या जिवाची होतीया काहिली।।
ओतीव बांधा, रंग गव्हाळा
कोर चंद्राची, उदात्त गुणांची।।
मैना रत्नाची खाण, माझा जीव की प्राण
नसे सुखाला वाण, तिच्या गुणांची छक्कड मी गायिली
माझ्या जिवाची होतीया काहिली।।
(माझी मैना गावावर राहिली)

वेगवेगळ्या उपमा देऊन अण्णाभाऊ स्त्रीत्वाचा सन्मान करतात, स्त्रीत्वाची उज्ज्वल प्रतिमा निर्माण करतात. हे अण्णाभाऊंच्या शाहिरीचे एक विशेष अंग आहे.

अण्णाभाऊंचे राष्ट्रप्रेम त्यांच्या साहित्यकृतींमधून बघावयास मिळते. देश आपलाच आहे, या जाणिवेतून अण्णाभाऊ भारत देशाचे भूषण असलेल्या महाराष्ट्राचा गौरव करताना म्हणतात,

महाराष्ट्र देशा आमुच्या, महाराष्ट्र देशा
आनंदवन भूवरी तू भूवरी भूषवी भारत वर्षा।।
(महाराष्ट्र देशा आमुच्या)

महाराष्ट्र ही वीरांची भूमी आहे. संतांची आणि शाहिरांची भूमी आहे. अशा आपल्या भूमीच्या रक्षणासाठी अण्णाभाऊ कंबर बांधून घाव झेलण्यासाठी सांगतात. अण्णाभाऊ महाराष्ट्रावर जीव ओवाळून टाकणारे होते. हे त्यांच्या शाहिरीने स्पष्टच केले आहे.

कंबर बांधून उठ घाव झेलाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया।।
(महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया)

अण्णाभाऊंच्या अंतकरणात संयुक्त महाराष्ट्रासाठी असलेली भावना त्यांचे राष्ट्रप्रेम व्यक्त करते.

अण्णाभाऊंची शाहिरी अशी सर्वांगाने प्रबोधन करणारी आहे. समाजाच्या उत्थानासाठी सतत संघर्ष करणारी आहे. समाजाचे वास्तव चित्र साकारणारी आहे. अण्णाभाऊंच्या शाहिरीबद्दल म्हणावेसे वाटते की, जग बदलण्याचा क्रांतिक विचार उरात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक भूमीतून उगवलेली क्रांतीबीजं म्हणजे अण्णाभाऊंची शाहिरी होय.

समारोप

अण्णाभाऊ साठे हे अभिजात कलावंताचे लेणे लेऊन जन्मास आलेले प्रतिभावंत कवी आणि श्रेष्ठ दर्जाचे लोकशाहीर आहेत. अण्णाभाऊ साठे हे कम्युनिस्ट विचार सरणीचे असल्याचे म्हटले जाते. पण अण्णाभाऊंची शाहिरी ही कम्युनिस्ट विचारांभोवती फिरत नाही तर ती सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशी चौफेर लढताना दिसते. कामगारांना, कष्टकऱ्यांना, उपेक्षितांना न्याय मिळवून देण्यासाठी झटताना दिसते. खरे म्हणजे आंबेडकरी जाणिवच अण्णाभाऊंच्या शाहिरीतून व्यक्त होताना दिसते. अण्णाभाऊंच्या साहित्याची प्रेरणाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक संघर्ष असल्याचे लक्षात येते.

अण्णाभाऊंनी 'फकिरा' ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणीस अर्पण केली आहे. बाबासाहेबांच्या विचारांना त्यांनी आपली श्रेष्ठ कलाकृती अर्पण करणे म्हणजे बाबासाहेबांच्या विचारांना अभिवादन करणे होय. बाबासाहेबांच्या परिवर्तनशील विचारांच्या वाटेवर आरूढ होऊन अण्णाभाऊंनी समाज जीवनाचे वास्तवचित्र आपल्या शाहितीतून साकारले आहे. या ऊर्जेतून अण्णाभाऊ 'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव' असा क्रांतिक उद्घोष करतात.

जातीच्या उतरंडीमुळे शिक्षणापासून दूर राहिलेले अण्णाभाऊ 'साहित्यसम्राट' होतात. अण्णाभाऊंच्या प्रतिभेची ही झेप सनातन्यांना लाजवणारी नव्हे काय? व्यवस्थेने जे दुःख अण्णाभाऊंना दिले त्या दुःखातून तमाम उपेक्षितांना मुक्त करण्यासाठी अण्णाभाऊंची शाहिरी आभाळभर गरजली आहे. अण्णाभाऊंच्या शाहिरीने कामगारांच्या, शोषितांच्या वाळवंटी जीवनात हिरवळीच्या वैचारिक बागा फुलविल्या. म्हणूनच अण्णाभाऊ कामगार वर्गाच्या जीवनातील परिवर्तनाची आंबेडकरी दिशा ठरले आहेत.

अण्णाभाऊंची शाहिरी छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरव करते. संपूर्ण स्त्रीजातीला शिक्षणाची दारं खुली करणाऱ्या महात्मा जोतीबा फुलेंचा अभिमान बाळगते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन करते. ती राष्ट्रप्रेमाची गाणी गाते. गावोगावच्या गिरणीत जाऊन कामगारांच्या चेतनेला जागवते. समाजपरिवर्तनासाठी त्यांच्यात ऊर्जा निर्माण करते. सावकारशाही, भांडवलशाही, साम्राज्यशाही अशा शोषक प्रवृत्यांचा जाहीर निषेध करते. विषमतावादी जुलमी व्यवस्था उलथून पाडण्यासाठी एकीचा किल्ला बांधून समाजाला संघटित करते. समाजाप्रती निष्ठा बाळगते. अण्णाभाऊंची शाहिरी आपल्या मैनासाठी कासाविस होते. हे सगळे वार झेलत अण्णाभाऊंची शाहिरी परिवर्तनासाठी खंबीर आणि गंभीर होते. 'बिनी मारायची अजून राहिली' असे म्हणताना ती संपूर्ण समाजाला सावध करीत आहे. अण्णाभाऊंच्या शाहिरीतील हे समाजवास्तव अत्यंत बोलके आहे.

निष्कर्ष

१) अण्णाभाऊंच्या शाहिरीतून कामगार जीवनाची वास्तविकता प्रतिबिंबीत होताना दिसते.
२) अण्णाभाऊंची शाहिरी विषमतावादी शोषक व्यवस्था उलथून टाकण्यासाठी सतत संघर्ष करताना दिसून येते.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक जाणिवेतून ही शाहिरी जग बदलण्याचा विचार सांगते.
४) अण्णाभाऊंची शाहिरी समाजजीवनाचे वास्तव चित्रण करताना दिसून येते.
५) अण्णाभाऊंची शाहिरी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा सगळ्याा प्रश्नांवर भाष्य करताना दिसते.
६) अण्णाभाऊंची शाहिरी अंधश्रद्धेवर आसूड ओढताना दिसून येते.
७) अण्णाभाऊंची शाहिरी सामाजिक परिवर्तनासाठी आसूसलेली दिसते.

संदर्भ

१) साठे अण्णाभाऊ : अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दहावी आवृत्ती, २०१४.
२) मनोहर डॉ. यशवंत : आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, द्वितीयावृत्ती, ३१ मे २०१२.
३) खरात डॉ. प्रकाश : मराठी साहित्यः प्रवाह आणि समीक्षा, महाराष्ट्र मराठी साहित्य परिषद, नागपूर, प्रथमावृत्ती, ६ डिसेंबर १९९९.

विश्वजीत कांबळे
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, शिवरामजी मोघे महाविद्यालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org